महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई या कार्यालयास सन २०१७-१८ या आर्थिक वर्षासाठी योजनांतर्गत अनुदान वितरीत करणेबाबत...

महाराष्ट्र शासन
अल्पसंख्याक विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः बियुडी २०१८/प्र.क्र.३१/का.४

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
तारीख: २३.०३.२०१८

वाचा -

१) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक : अर्थसं २०१७/प्रक्र.७५/अर्थ-३, दि.१८/०४/२०१७
२) शासन परिपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग अविवि २०१७/प्रक्र.३१/का.४, दि.१९/०४/२०१७
३) शासन परिपत्रक, वित्त विभाग, अर्थसं-२०१७/प्र.क्र.९४/अर्थ-३, दि.३०/०६/२०१७
४) शासन पूरकपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग, अविवि २०१७/प्रक्र.३१/का.४, दि.१८.०८.२०१७,
५) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, उसाअ २०१७/प्रक्र.६८/उसाअ, दि.०४.०१.२०१८,
६) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, बियुडी २०१८/प्रक्र.३१/उसाअ, दि.२४.०१.२०१८,
७) शासन शुध्दीपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग, बियुडी २०१८/प्रक्र.३१/का.४, दि.१७.०२.२०१८,
८) शासन शुध्दीपत्रक, अल्पसंख्याक विकास विभाग, बियुडी २०१८/प्रक्र.३१/का.४, दि.२१.०२.२०१८,
९) शासन परिपत्रक, वित्त विभाग, अर्थसं- २०१७/प्रक्र.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८,
१०) शासन निर्णय, अल्पसंख्याक विकास विभाग, उसाअ २०१७/प्रक्र.६८/उसाअ/का-४, दि.२१.०३.२०१८,

प्रस्तावना -

राज्यात उर्दू भाषेचा विकास, संवर्धन, प्रगती तसेच उर्दू व मराठी भाषेतील साहित्यिकांमध्ये वैचारीक आदान प्रदान होऊन राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ व्हावी या उद्देशाने महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार वर्ष २०१७-१८ या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीसाठी उर्वरित अनुदान वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय -

महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात योजनांतर्गत खर्चाच्या बाबींकरिता रु.१.०० कोटी इतकी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली आहे. वरील संदर्भ क्र.१,२,३व ४ व येथे उल्लेखित परिपत्रकान्वये, मंजूर अर्थसंकल्पीय तरतुदीच्या महसूली लेख्यातील अनिवार्य बाबीवरील निधी वितरित करण्यास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन व वरील संदर्भ क्र.५ येथील प्रशासकीय मान्यतेपर्यंत अनुसरुन उर्दू साहित्य अकादमीसाठी वरील संदर्भ क्र.६ येथील शासन निर्णयान्वये रु.७०.०० लाख इतके अनुदान वितरित करण्यात आलेले आहे. आता वित्त विभागाने संदर्भ क्र.९ येथील परिपत्रकान्वये ८०% इतक्या

मर्यादेत अनुदान वितरित करण्यास प्रशासकीय विभागांना अधिकार प्रदान केले आहेत. त्यानुसार सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता मंजूर असलेल्या अनुदानातून वित्त विभागाच्या संदर्भ क्र.९ येथील मान्यतेस तसेच संदर्भ क्र.१० येथील प्रशासकीय मान्यतेस अनुसरुन रु.१०,००,०००/- (रु.दहा लाख फक्त) इतके योजनांतर्गत अनुदान महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहे.

२. उपरोक्त खर्च "मागणी क्र.झेडई-०१, २२३५,सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण, २०० इतर कार्यक्रम ०१- अल्पसंख्याकांना सहाय्य, राज्य योजनांतर्गत योजना (०१) (२३) महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीच्या विविध योजनांसाठी सहाय्यक अनुदान राज्य योजनेअंतर्गत योजना (२२३५ बी ०९४) ३१ सहाय्यक अनुदान" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमीचा खर्च मंजूर अनुदानाच्या विहित मर्यादेत राहील याची अधिक्षक-नि-कार्यकारी अधिकारी यांनी दक्षता घ्यावी. तसेच शासनाने खर्चाबाबत विहित केलेल्या नियमानुसार अटी व शर्तीचे पालन करुन कार्यवाही करावी.

४. उपरोक्त अनुदान महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई यांना प्रदान करण्यासाठी अवर सचिव (का-१), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना "आहरण व संवितरण अधिकारी" आणि उपसचिव, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांना "नियंत्रक अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना याबाबतच्या देयकांवर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे. उक्त रक्कम एक रकमी पध्दतीने महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई यांना त्वरित अदा करण्यात यावी. सदर रकमेचा इसीएस (ECS) अवर सचिव (१), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या नांवाने काढण्यात यावा. अधिक्षक-नि-कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई यांनी सदर खर्चाचे तपशील व निधीचे विनियोगाचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित कालावधीत सादर करणे अनिवार्य राहील.

५. हे आदेश, शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक: अर्थसं- २०१७/प्रक्र.७५/अर्थ-३, दि.०६.०२.२०१८ अन्वये प्राप्त मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे. तसेच वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७ च्या प्रत्येक अटीची पूर्तता करण्यात आलेली आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२३१५५१३५७९१४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Farooq Ahmed Noorkhan Pathan

Digitally signed by Farooq Ahmed Noorkhan Pathan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Minorities Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8710a75e5d45e9ece43bf14a0466b5933cf850802ac2a6564bc406784d303439, serialNumber=587f2890baec1d472c7d603da44bbe3ab165e637d985e3d5faab6d295ffa3a45, cn=Farooq Ahmed Noorkhan Pathan
Date: 2018.03.23 17:22:37 +05'30'

(फा.नू. पठाण)

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१ मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन,

२ महालेखापाल १/२ (लेखा परिक्षा), (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई/नागपूर,

३ संचालक, लेखा व कोषागारे (संगणक कक्ष), नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई,

४ अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,

५ अवर सचिव /कक्ष अधिकारी (का.७), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

६ अवर सचिव (का.४), अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई,

७ खाजगी सचिव, मा.मंत्री/मा.राज्यमंत्री, अल्पसंख्याक विकास, मंत्रालय, मुंबई.

८ कार्याध्यक्ष, महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई (अकादमीच्या कार्यालयामार्फत)

९ रोख शाखा, अल्पसंख्याक विकास विभाग, मंत्रालय, मुंबई. (२ प्रतीत)

१० अधिक्षक- नि-कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य उर्दू साहित्य अकादमी, मुंबई.

११ कार्यासन-४, संग्रहार्थ.